# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## - घोषणा -

**विषय :- राज्य सेवा (मुख्य) परीक्षेच्या मराठी व इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप बदलण्याबाबत**

राज्य सेवा (मुख्य) परीक्षेच्या मराठी व इंग्रजी या दोन विषयांच्या प्रश्नपत्रिकांच्या स्वरुपाबाबत बदल करण्याची बाब आयोगाच्या विचाराधीन होती. याबाबत आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ०३.०२.२०१६ रोजी दिलेल्या घोषणेस अनुसरुन, प्राप्त प्रतिक्रियांवर/सुचनांवर विचार करुन आयोगाने त्यातील "क" पर्याय म्हणजेच मिश्र स्वरुपाचा पर्याय, दोन्ही पेपरचे गुण गुणवत्ता यादीकरिता ग्राहय धरण्यात येतील या बदलासह मान्य केला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

**मिश्र स्वरुप**

**मराठी व इंग्रजी दोन्ही पेपर्समधील अर्धा भाग वर्णनात्मक/परंपरागत राहील व अर्धा भाग वस्तुनिष्ठ बहुपर्यायी राहील. दोन्ही भागांचे गुण, गुणवत्ता यादीसाठी ग्राह्य धरण्यात येतील. (तपशील खालीलप्रमाणे)**

**पेपर क्रमांक - १ :-** **भाषा पेपर – १ (पारंपरिक/वर्णनात्मक)**

**एकूण गुण** :- १०० **एकूण वेळ** :- ३ तास

**भाग** १) **मराठी – ५० गुण**

१) निबंध लेखन – २५ गुण (दोन पैकी एका विषयावर सुमारे ४०० शब्दांचा निबंध लिहिणे)

२) भाषांतर – १५ गुण (इंग्रजी उता-यांचे मराठीत भाषांतर करणे, सुमारे अर्धे पान/ २ परिच्छेद)

३) सारांश लेखन – १० गुण.

**भाग २)** **इंग्रजी – ५० गुण**

१) Essay writing – 25 Marks - Writing an essay on one of the two given subjects. ( About 400 words)

२) Translation – 15 Marks (Printed Marathi matter of half page/2 paragraphs to be translated into English.)

३) Precis writing – 10 Marks

भाषा पेपर क्रमांक १ मधील, दोन्ही भागांसाठी एकच संयुक्त प्रश्नपत्रिका राहील. मात्र उत्तरपुस्तिका दोन्ही भागांसाठी स्वतंत्र राहतील. दोन्ही भागांसाठी मिळून एकत्रित वेळ ३ तास.

**पेपर क्रमांक- २** :-

**भाषा पेपर -२ (वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी)**

**एकुण प्रश्न** :- १०० **एकुण गुण** :- १०० **एकुण वेळ** : - एक तास

**भाग -१) मराठी** -५० **प्रश्न**, ५० **गुण.**

**भाग -२) इंग्रजी** -५० **प्रश्न**, ५० **गुण.**

- भाषा पेपर क्रमांक-२ करिता प्रश्नपुस्तिका एकच राहील. त्यात दोन भाग राहतील. भाग १) मराठी भाषेचे प्रश्न क्रमांक १ ते ५० आणि भाग २) इंग्रजी भाषेचे प्रश्न क्रमांक ५१ ते १००.
- दोन्ही भागांमधील प्रश्नांच्या प्रकारांमध्ये जास्तीत जास्त वैविध्य राहील. उदा. व्याकरण, म्हणी, वाक्प्रचार, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, शब्दांची उगम भाषा, वाक्यांवर/उता-यावर आधारित प्रश्न, शुद्धलेखन/विरामचिन्हे इ.
- भाषेची समज, आकलन, सुक्ष्म भेद, शब्दांचे नेमके अर्थ, त्यांचा वाक्यांमध्ये उपयोग अशा स्वरुपाचे म्हणजेच भाषेची व त्यातील बारकाव्याची समज जाणून घेणा-या प्रश्नांवर भर देण्यात येईल.
- सामान्य अध्ययनाच्या इतर ४ विषयांप्रमाणे या विषयामध्येही निगेटीव्ह मार्किंग राहील. (तीन चुकीच्या उत्तरास एक गुण वजा)
- भाषा पेपर -२ च्या दोन्ही भागांची मिळून एकच सामाईक उत्तरपत्रिका राहील.
- भाषा पेपर – १ व २ या दोन्ही पेपर्सचे गुण (२०० गुण ) अंतिम गुणवत्ता यादीमध्ये विचारात घेण्यात येतील.

**सदरहू निर्णय राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०१६ पासून अंमलात येईल.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २० मे, २०१६**

**राजेंद्र मंगरुळकर**
**सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**